**प्रेसनोट दि.११/०८/२०१९**
**मुंढवा पोलीस ठाणे, पुणे शहर.**
**प्रेयसीचा खुन करण्याचा प्रयत्न करणारे प्रियकर व दोन्ही साथीदारांना ठोकल्या बेडया**

दि. ०८/०८/२०१९ रोजी मुलगी नाम ही सायंकाळी ०६.०० वा चे सुमारास कामावरुन घरी जात असताना तिस मुंढवा ब्रिज जवळ तिचा प्रियकर नामे प्रसाद रमेश सोनवणे, वय २९, रा. स्वामी विवेकानंद नगर, रामटेकडी, पुणे व त्याचे दोन साथीदार १) नदिम शेख, रा. सय्यदनगर, हडपसर, पुणे व २) चंदन राजु चव्हांडके, रा. कोंढवा, पुणे यांनी हे रिक्षामध्ये येवून फिर्यादी मुलीस बळजबरीने रिक्षामध्ये बसविले आणि रस्त्यामध्ये तिस लग्नास होकार देण्याबाबत जबरदस्ती करीत असताना सदर मुलीने नकार दिल्याने तिचा प्रियकर प्रसाद सोनवणे याने त्याचेकडील धारधार हत्याराने तिच्या अंगावरती वार करुन जखमी केले. जखमी मुलगी सध्या ससून हॉस्पीटल, पुणे येथे उपचार घेत असून, तिने दिलेल्या फिर्यादी वरुन नमूद आरोपीतांविरुध्द मुंढवा पोलीस ठाणे गु.र.नं. २५६/१९ भा.द.वि. कलम ३०७,३४२,३५४(ड),३६६,५०४,५०६,३४ अन्वये दि. ०९/०८/२०१९ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयातील आरोपी नामे १) प्रसाद रमेश सोनवणे, वय २९, रा. स्वामी विवेकानंद नगर, रामटेकडी, पुणे २) नदिम शेख, रा. सय्यदनगर, हडपसर, पुणे व ३) चंदन राजु चव्हांडके, रा. कोंढवा, पुणे यांना मुंढवा पोलीस ठाणे कडील तपास पथकाचे अधिकारी पोलीस उप निरीक्षक, अमोल गवळी व कर्मचारी यांनी गोपनीय बातमीदारामार्फत माहिती प्राप्त करुन व तात्रिंक विश्लेषनात्मक तपास करुन शिताफीने नमूद तिनही आरोपीतांना अटक करण्यात आली असून, दाखल गुन्हयाचा तपास सहा. पोलीस निरीक्षक, पंडीत रेजितवाड हे करीत आहेत.

दाखल गुन्हयातील आरोपीतांना मा. सुनिल फुलारी, अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, पुणे, सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ५, पुणे शहर, सुनिल देशमुख, सहा. पोलीस आयुक्त, हडपसर विभाग, पुणे शहर, प्रभारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक शिवाजी शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली पंडीत रेजितवाड, सहा. पोलीस निरीक्षक, अमोल गवळी, पोलीस उप निरीक्षक, मुंढवा पोलीस ठाणे व सहा पोलीस फौजदार सोनवणे, पो.हवा. २९६२ पवार, पोना१५९० गायकवाड, पो.ना २५३२ जगताप, पोनि १५९० गायकवाड, पो.ना ६५४५ चव्हाण पो.ना. ७६९५ जाधव, पोशि ७६७७ काकडे,पोशि. ८१८१ शिंदे, पो.शि.७७०० कांबळे, पो.शि८२२६ देशमुख यांनी शिताफिने अटक करुन दाखल गुन्हा उघडकीस आणलेला आहे.

तरी नमूद पोलीस अधिकारी व कर्मचा यांच्या चांगल्या कामगिरीबद्दल दैनिक वर्तमानत्रामध्ये प्रसिध्दी देण्यास विनंती आहे.

**दि.०९/०८/२०१९**

**(शिवाजी शिंदे)**
प्रभारी **वरिष्ठ पोलीस निरीक्षक**
**मुंढवा पोलीस स्टेशन पुणे शहर**